संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# प्रशासन, शासन आणि शीर्षासन

**अंधेर** नगरी आणि चौपट राजा या म्हणीचा परिचय महाराष्ट्र सरकारच्या कारभारातून स्पष्टपणे होऊ शकतो. ज्या सरकारला न्यायालयांकडून सातत्याने तडाखे खावे लागतात किंबहुना न्यायालयाने शेपटी पिरगळल्याशिवाय राज्याचे प्रशासन जागेच होत नाही अशी विधाने एकापाठोपाठ जेव्हा घडतात तेव्हा सुशासन किंवा पारदर्शी प्रशासन याचा कसा बट्ट्याबोळ होतो हे वेगळे सांगण्याची गरज उरत नाही. डान्सबार प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडून राज्य सरकारला दुसऱ्यांदा तडाखा बसला आहे. सरकारच्या कायद्यातली हवाच काढून घेण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाने केले. त्याच्या दोनच दिवस आधी शिवस्मारकाच्या कामावर स्थगिती देणारा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. या स्मारकासाठी योग्य त्या परवानग्या घेतल्या गेलेल्या नाहीत.त्याबाबत सर्व गोष्टींची पूर्तता करावी तोपर्यंत शिवस्मारकाचे बांधकाम करू नये. अशा शब्दात न्यायालयाने राज्यसरकारला फटकारले होते. आता औरंगाबाद खंडपीठाने राज्याचे अन्नपुरवठा मंत्री गिरीश बापट यांना दणका दिला असून ज्या रेशनदुकानदारांविरुध्द कारवाई केली गेली होती त्यांची पाठराखण केल्याबद्दल न्यायालयाने गिरीश बापटांवर कडक शब्दात ताशेरे ओढले आहेत. गेल्या चार दिवसातली ही तीन उदाहरणे पुरेशी बोलकी ठरतात. गेल्या सहा महिन्यातल्या निर्णयांचा आढावा घेतला तर आणखी चार पाच प्रकरणांमध्ये न्यायालयाने राज्य सरकारची कानउघाडणी केल्याचेच पाहायला मिळेल. त्यामध्ये अनधिकृत बांधकामांना संरक्षण देण्याविरोधात न्यायालयाने घेतलेली भूमिका विदर्भातल्या जलसंधारण प्रकल्पांमधल्या भ्रष्टाचारप्रकरणी सरकारने स्वीकारलेले नरमाईचे धोरण अशा काही प्रकरणांचा सहज समावेश होऊ शकेल. विशेष म्हणजे न्यायालयांमध्ये सरकारची बाजूच टिकून राहात नाही. म्हणजेच ती कमकुवत ठरते. यावरून एकूणच राज्यकारभारातलाकिंवा प्रशासनातला भोंगळ आणि ढिसाळपणाच अधोरेखित होतो. सुशासन किंवापारदर्शी प्रशासन हे शब्द बोलायला जरी बरे वाटत असले तरी न्यायालयाकडून वारंवार सरकारला फटकारले जाणे म्हणजे त्याच शासनाला शिर्षासन करायला लावण्याची शिक्षा दिल्यासारखे ठरते. दोन चार महिन्यामधून एखाद्या प्रकरणात न्यायालयाने जाब विचारणे ही गोष्ट वेगळी. परंतु सर्वोच्च न्यायालयामध्ये राज्याची भूमिकाच मान्य होऊ नये. हे तर आणखीनच धक्कादायक ठरते.

### फिर एक बार डान्सबार

डान्सबार प्रकरणात तर सरकारची चांगलीच छी थू झाल्यासारखी परिस्थिती आहे. आतापर्यंत दोनवेळा सर्वोच्च न्यायालयाने डान्सबार प्रकरणात राज्यसरकारची कानउघाडणी केली. २०१६ साली स्वतंत्र कायदा करून ही बंदी लादली गेली. परंतु त्यातल्या तरतूदी या खूपच संदिग्ध असल्यामुळे न्यायालयात त्या टिकण्याची शक्यताही नव्हती. डान्सबार हा प्रकार पुरोगामी महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेला बट्टा लावणाराच ठरतो. २००५ साली तत्कालिन मंत्री आर.आर. पाटील यांनी सर्वंकष अभ्यास करून ही डान्सबार बंदी आणली होती. सरकारच्या मोठ्या महसूलावर पाणी सोडून राज्यात उध्वस्त होत असलेल्या कुटुंबांना आधार देण्याचे काम केले होते. घर गहाण ठेवून किंबहुना चोऱ्यामाऱ्या करून व्यसनाधिन होणाऱ्या तरूण पिढीला वाचवण्याचा त्यामागे उद्देश होता. केवळ डान्सबारवर पैसे उधळता यावेत म्हणून पैशासाठी आपल्या आईचा खून करणारा कृतघ्न प्रकार नव्या मुंबईत घडला होता. असे अनेक दुर्देवी प्रकार घडल्यामुळेच ही डान्सबार बंदी आणली गेली. अर्थातच बारमालकांच्या शेपटावरच पाय पडल्याने ते चवताळणे स्वाभाविक होते. आणि मग ही डान्सबार बंदी कशी गैरलागू आहे हे सिध्द करण्याचा आटापीटा केला गेला. यामधून महिलांच्या बेरोजगारीचा प्रश्न पुढे आणला गेला. परंतु आर.आर. पाटील यांच्या कुटुंबियांनी स्थापन केलेल्या फाऊंडेशननेसुध्दा या प्रकरणात जनहित याचिका दाखल केली होती आणि बारबालांच्या बेरोजगारीचा प्रश्न कसा चुकीचा आहे हे पटवून दिले होते. कारण डान्सबारमध्ये काम करणाऱ्या सत्तर टक्के महिला या बांगलादेशी असल्याचे आर.आर पाटील यांच्या कन्या सीमा पाटील यांनीच सरकारच्या हे लक्षात आणून दिले होते. ही जर वस्तुस्थिती असेल तर मग डान्सबार हा केवळ काही हितसंबंधी लोकांनी चालवलेला व्यसनाचा आणि शोषणाचा राजमार्ग असल्याचेच दिसून येईल. एकीकडे लोककल्याणाच्या गप्पा मारायच्या परंतु प्रत्यक्षात सामान्य जनतेच्या हिताचे संरक्षण करताना ठोस भूमिका घ्यायची नाही असा हा शासकीय स्तरावरचा अत्यंत दुर्देवी दुटप्पीपणा ठरतो. इतके व्यापक सामाजिक हित असूनही सरकारची बाजू न्यायालयात टिकून राहू शकत नसेल तर नाईलाजाने सरकारच्या हेतू विषयीच शंका घ्यावी लागते.

### सुशासनाचे धिंडवडे

यातला विलक्षण योग असाकी केवळ चार दिवसात न्यायालयाच्या तीन आदेशांनी सरकारच्या कार्यक्षमतेविषयीच प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. ज्या सरकारने अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय स्वतःच्या प्रतिष्ठेचा केला होता परंतु तिथेसुध्दा सरकारला स्वतःच्या कार्यक्षमतेची किंवा निर्णयातल्या पारदर्शकतेची बूज राखता आलेली नाही. आता सरकारने त्यासंदर्भात खास चार वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्लीला पिटाळले आहे. शिवाजी स्मारकाबाबत आणखी बेअब्रू होऊ नये हाच त्यामागचा हेतू दिसतो. यामधून सरकारची पर्यायाने मंत्र्यांच्या कार्यक्षमतेचे नकळतपणे धिंडवडे निघतात हे गिरीश बापटांवरच्या ताशेऱ्यांवरून स्पष्ट होते. गंमतीचा भाग म्हणजे केंद्र आणि राज्य सरकारच्या मदतीने म्हाळगी प्रबोधिनीतर्फे राष्ट्रीय सुशासन परिषदेचे आयोजन केले गेले आहे. केंद्र आणि राज्य सरकारमधल्या सुशासनाचे कोडकौतुक त्यामधून केले जाईलच. आणि पारदर्शक व्यवहार करून केंद्र आणि राज्यातील सरकार हेच कसे कार्यक्षम असल्याचे ठासून सांगितले जाईल. परंतु गेल्या चार पाच दिवसात न्यायालयाने दिलेले तडाखे दोन्ही सरकाराच्या तथाकथित सुशासनाचे धिंडवडे काढणारे ठरतात. वारंवार पारदर्शक शासन आणि प्रशासनाचा ढोल पिटत असताना अनेकवेळा न्यायालयाला कान पिळण्याची वेळ यावी हे कशाचे निदर्शक मानायचे.